तरुण भारत




# चेतन पाटोळे यांना शिवाजी विद्यापीठाचा गुणवंत प्रशासकीय सेवक पुरस्कार

**कसबा बावडा :** न्यू कॉलेज कोल्हापूर येथील प्रयोगशाळा सहाय्यक चेतन पाटोळे यांना शिवाजी विद्यापीठाचा गुणवंत प्रशासकीय सेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या हीरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात विविध पुरस्कारांचे वितरण उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांच्या हस्ते झाले.

लोकमत

# मतदार नोंदणी मदत कक्ष शिवाजी विद्यापीठात सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या परिसरात जिल्हा निवडणूक शाखेतर्फे मतदार नोंदणी मदत कक्ष बुधवारी सुरू करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांनी शनिवार (दि.२६) पर्यंत मतदार नोंदणी कक्षास भेट देऊन नवीन मतदार नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या मतदार नोंदणी कक्षाद्वारे नवतरुण मतदार यांची मतदार नोंदणी, मतदार यादीतील तपशील दुरुस्त करणे याकरिता नमुना क्रमांक ६, नमुना क्रमांक ८ चे अर्ज भरून घेणे. चौकशीद्वारे मतदार यादीच्या नोंदणी प्रक्रियेची माहिती देणे, आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदार नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. जिल्ह्यातील नव मतदारांना या सुविधेचा लाभ होणार आहे असे प्रशासनाने सांगितले.

पुढारी



कोल्हापूर : कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपमध्ये विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देताना प्रशांत आयरेकर व रवींद्र बागल.

# कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला विद्यापीठात उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनतर्फे घेण्यात आलेल्या कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

बी न्यूजचे वरिष्ठ कॅमेरामन प्रशांत आयरेकर व 'पुढारी' डिजिटलचे रवींद्र बागल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शटर स्पीड, अॅपर्चर, आयएसओ आदीसंदर्भात प्राथमिक माहिती दिली. कॅमेरा अँगल, झूम इन, झूम आऊटबद्दल सांगितले. व्हिडिओग्राफी, व्हिडिओ अँगल, बॉडी लँग्वेज याबाबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना काही टिप्स दिल्या.

विद्यार्थ्यांनी सुरुवातीला अध्यासनाच्या बाहेर फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी केली. त्यानंतर मार्गदर्शकासह विद्यार्थ्यांनी नॅनो टेक्नॉलॉजी, विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यालगत फोटोग्राफीचे प्रात्यक्षिक केले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी व्हिडिओग्राफी करून तज्ज्ञांच्या मदतीने प्रात्यक्षिक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. यावेळी पत्रकारिता विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, सहयोगी शिक्षक डॉ. आलोक जत्राटकर, मोहसिन मुल्ला, मतीन शेख, अक्षय दळवी, चेतन गळगे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठामधील मतदार नोंदणी मदत कक्षास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामध्ये जिल्हा निवडणूक शाखेतर्फे सुरू करण्यात आलेल्या मतदार नोंदणी मदत कक्षास नवमतदारांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

विद्यापीठ परिसरातील विविध अधिविभागातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, कर्मचारी, अधिकारी मतदार मदत नोंदणी कक्षास भेट देवून नमुना क्र.६ व नमुना क्र.८ या अर्जांची माहिती घेतली. दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी मदत कक्षास भेट दिली आहे. सायंकाळी उशिरापर्यंत मतदान ओळखपत्र संदर्भातील विविध शंकांचे निरसन करण्याचे काम जिल्हा निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी केले. २६ नोव्हेंबर पर्यंत मतदार नोंदणीचे कामकाज चालणार आहे.

तरूण भारत

# निसर्गोपचार दिनानिमित्त रानभाज्यांवर व्याख्यान

**कोल्हापूर :** राष्ट्रीय निसर्गोपचार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात 'दैनंदिन जीवनात रानभाज्यांचे महत्व" या विषयावर डॉ. अशोक वाली यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. आर. जी. पवार होते. डॉ. वाली म्हणाले, रानभाज्यांची ओळख, प्रकार व त्यांचे औषधी गुणधर्म याबाबत माहिती दिली. दैनंदिन जीवनात रानभाज्यांचा वापर कसा करावा, हे दर्शवणारा छोटासा माहितीपटही सादर केला, व्याख्यानाप्रसंगी इनॉला अशा केना, पेंडुर, काटेकोळशेंदा, मोरशेंड, चांगेरी, वंशवेल, औदूंबर जलाची माहिती देण्यात आली. कार्यक्रम समन्वयक डॉ. सुमन बूवा यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रास्ताविक डॉ. श्वेतलिना पाटील यांनी केले. स्वागत आसावरी कागवाडे यांनी केले. सूत्रसंचालन सागर जाधव यांनी केले. आभार अरविंद पालके यांनी मानले. यावेळी डॉ. वसंत सिंघन, डॉ. गोखले, उदय घाटे उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. शरद बाविस्कर यांचे विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'सामाजिक परिवर्तनशीलता आणि शिक्षण' या विषयावर शुक्रवारी (दि. २५) सकाळी ११ वाजता वि.स. खांडेकर सभागृह, भाषा भवन येथे व्याख्यानाचे आयोजन केले आहे. 'भुरा' आत्मकथनाचे लेखक, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्लीचे डॉ. शरद बाविस्कर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी मराठी विभागातील प्रा. रणधीर शिंदे असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 NOV 2022
लोकमत

# जिल्ह्यात 'मधाचे गाव' आणि 'रेशमाचे गाव' उपक्रम राबवणार

## जिल्हाधिकारी राहुल रेखावार : मधमाशी मित्रांची तुकडी तयार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मध आणि रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी जिल्ह्यात 'मधाचे गाव' आणि 'रेशमाचे गाव' उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी बुधवारी दिली. मधमाशांना हानी न पोहोचवता पर्यावरणपूरक पद्धतीने मधाचे पोळे काढण्यासाठी पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात २५ मधमाशी मित्रांची तुकडी तयार झाली असून, ही अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.



शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील आग्या मधमाशांचे पोळे बुधवारी मधमाशी मित्र मोहन कदम, ज्ञानेश्वर पाटील व संजय घोरपडे यांनी पर्यावरणपूरक पद्धतीने काढले.

जिल्हाधिकारी कार्यालय, नाबार्ड व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने आयोजित मधमाशी मित्र प्रशिक्षण कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी दत्तात्रय कुरुंदवाडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय संचालक अधिकराव जाधव, केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण अनुसंधान विभागाचे सहायक संचालक सुनील पोखरे, महात्मा गांधी नॅशनल फेलो संदेश जोशी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील आग्या मधमाशांचे पोळे पर्यावरणपूरक पद्धतीने काढून मधमाशी मित्र कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.यावेळी तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. कविता ओझा आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाचा कबड्डी पुरुष संघ जाहीर

**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी पुरुष स्पर्धा २५ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूर, मध्य प्रदेश या ठिकाणी होणार आहेत. स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा १२ खेळाडूंचा संघ गुरुवारी जाहीर करण्यात आला. संघासोबत प्रशिक्षक म्हणून डॉ. रमेश भेंडीगिरी आणि संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. संजय पाटील आहेत. संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व संचालक क्रीडा अधिविभाग प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

25 NOV 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात मधमाशी मित्रांची तुकडी तयार : जिल्हाधिकारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मधमाश्यांना हानी न पोहोचवता पर्यावरणपूरक पद्धतीने मधाचे पोळे काढण्यासाठी पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात २५ मधमाशी मित्रांची तुकडी तयार झाली आहे. ही अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्गार काढून मधमाशी मित्र तयार करण्यासाठीची ही कार्यशाळा देशातील अभिनव उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, नाबार्ड व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने मधमाशी मित्र प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते मधमाशी मित्र प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील आग्या मधमाश्यांचे पोळे पर्यावरणपूरक पद्धतीने काढून मधमाशी मित्र कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. कविता ओझा व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मधमाशी मित्र मोहन कदम, ज्ञानेश्वर पाटील व संजय घोरपडे यांनी हे प्रात्यक्षिक करून दाखवले.

**यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी दत्तात्रय कुरुंदवाडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय संचालक अधिकराव जाधव, केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण अनुसंधान विभागाचे सहायक संचालक सुनील पोखरे, महात्मा गांधी नॅशनल फेलो संदेश जोशी आदी उपस्थित होते.**

25 NOV 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मधमाशी मित्र' देशातील अभिनव उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

मधमाशांना हानी न पोहोचवता पर्यावरणपूरक पद्धतीने मधाचे पोळे काढण्यासाठी पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात २५ मधमाशी मित्रांची तुकडी तयार झाली आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. मधमाशी मित्र तयार करण्यासाठीची ही कार्यशाळा देशातील अभिनव उपक्रम आहे, असे गौरवोद्गगार जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी बुधवारी येथे काढले.

जिल्हाधिकारी कार्यालय, नाबार्ड व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे आयोजित मधमाशी मित्र प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी दत्तात्रय कुरुंदवाडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय संचालक अधिकराव जाधव, केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण अनुसंधान विभागाचे सहायक संचालक सुनील पोखरे, महात्मा गांधी नॅशनल फेलो संदेश जोशी आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील आग्या मधमाशांचे पोळे पर्यावरण पूरक पद्धतीने

- जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांचे गौरवोद्गार

काढून मधमाशी मित्र कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी जिल्हाधिकारी रेखावार, शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस.एन.सपली, संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. कविता ओझा उपस्थित होते. मधमाशी मित्र मोहन कदम, ज्ञानेश्वर पाटील व संजय घोरपडे यांनी हे प्रात्यक्षिक करुन दाखवले. सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी रेखावार यांच्या हस्ते मधमाशी मित्र प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. जिल्हाधिकारी रेखावार म्हणाले, नाबार्ड, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि कृषी विभागाच्या सहकार्याने आयोजित ही प्रशिक्षण कार्यशाळा मधमाशा जतन व संवर्धन करण्यासाठी उपयुक्त ठरेल. मधमाशांना हानी न पोहोचवता, मधमाशांचे संवर्धन करत पर्यावरणपूरक पद्धतीने मध संकलन करण्याची माहिती देण्यासाठी आयोजित या कार्यशाळेतील महिलांचा सहभाग कौतुकास्पद बाब आहे.

तरुण भारत

# विद्यापीठाचा कबड्डी पुरूष संघ जाहीर

**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी पुरुष स्पर्धेला आज २५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे. या स्पर्धा २५ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत मध्यप्रदेश येथील जबलपूरमधील राणी दुर्गावती विद्यापीठात होणार आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा १२ खेळाडूंचा संघ शुक्रवारी जाहीर झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी संघाला मार्गदर्शन करीत शुभेच्छा दिल्या. शिवाजी विद्यापीठाच्या कबड्डी संघामध्ये संजित पाटील, पृथ्वीराज चव्हाण, साईप्रसाद पाटील, स्वराज साळवी, निखिल जाधव, ओंकार इंजल, शुभम पाटील, ज़मीर शेख, सौरभ चौगुले, किरण गोसावी, अमन भिसुरे, तानाजी पवार, इत्यादी खेळाडू आहेत. संघासोबत प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडेगिरी आणि संघ व्यवस्थापक डॉ. संजय पाटील आहेत.